**गोपनीय**

**क्रमांक : का.स./बैठक/२६७**

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण**
वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),
मुंबई - ४०० ०५१.
दिनांक : ०१ मार्च, २०२१

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १८ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या २६७व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

१/३/२०२१
**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रती,**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बांठिया<br>१००३/१००४, १० वा मजला,<br>बिल्डींग नं.३-ए, ग्रीन एकर्स,<br>लोखंडवाला कॉम्प्लेक्स, अंधेरी (प),<br>मुंबई – ४०० ०५३ | - | सदस्य |
| श्री. ना. वि. मेराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०२५. | - | सदस्य |
| डॉ. शिरीष संख्ये<br>संचालक, मेकॅन्सी अँड कंपनी,<br>एक्सप्रेस टॉवर, २१ वा मजला,<br>नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. | - | सदस्य |
| महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका,<br>मुंबई - ४०० ००१. | - | सदस्य |
| प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

प्रधान सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक, - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

**निमंत्रित :**

अपर मुख्य सचिव,
वित्त विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

अतिरिक्त महानगर आयुक्त तथा प्रकल्प संचालक, मुं.म.प्र.वि.प्रा.

अतिरिक्त महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा.

सह महानगर आयुक्त, मुं.म.प्र.वि.प्रा.

****

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या २६७व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | : | **१८ फेब्रुवारी, २०२१ (गुरूवार)** |
| **वेळ** | : | **सकाळी ११.३० वाजता** |
| **स्थळ** | : | **मा. मुख्य सचिव यांचे समिती कक्ष<br>६वा मजला, मंत्रालय,<br>मुंबई – ४०० ०३२.** |

**उपस्थित सदस्य :**

| | | |
|---|---|---|
| श्री. संजय कुमार<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री. जयंत कुमार बाँठिया | - | सदस्य |
| श्री. आर.ए.राजीव<br>महानगर आयुक्त<br>मुं. म. प्र. वि. प्राधिकरण | - | सदस्य |
| श्री. भूषण गगराणी<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग, | - | सदस्य |

**निमंत्रित :**

डॉ. के.एच.गोविंद राज
अतिरिक्त महानगर आयुक्त (२)/
अतिरिक्त महानगर आयुक्त / प्रकल्प सचंलाकल (अ.का.),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. बी.जी.पवार
सह-महानगर आयुक्त
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मूर्ती
संचालक (प्रकल्प),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.राजीव अग्रवाल
संचालक (प्रणाली),
मेट्रो अंमलबजावणी शाखा,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

कु. उमा अडुसुमिली
प्रमुख, नियोजन विभाग /
परिवहन व दळणवळण विभाग, (अ.का.),
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. माधव नागरगोजे
वित्तीय सल्लागार,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

डॉ. डी.टी.ठुबे
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.एम.एस. नारकर
मुख्य अभियंता (अ.का.),
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री. आर.एम.गोटाफोडे
मुख्य लेखा अधिकारी,
वित्त व लेखा विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्रीमती सु.भू.पेदे
सचिव, कार्यकारी समिती
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

बैठकीच्या सुरुवातीस, महानगर आयुक्त यांनी मा.मुख्य सचिव व अध्यक्ष, कार्यकारी समिती यांचे स्वागत केले.

त्यानंतर, विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या २६६व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १५ ऑक्टोबर, २०२० रोजी झालेल्या २६६व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र. ३ : मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या मुंबईकडील बाजुस वाहतुक निर्गमन व्यवस्थेकरीता (Traffic Dispersal System) शिवडी ते वरळी या उन्नतमार्ग प्रकल्पाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणे या कामाकरीता मे. स्टुप कन्सल्टंट्स प्रा.लि. यांच्या देकारास मान्यता मिळण्याबाबत.**

३.१ अतिरिक्त महानगर आयुक्त (२), यांनी सदर प्रकल्पाबाबत समितीस अवगत केले की, सुमारे ४.५ कि.मी. लांबीचा शिवडी - वरळी उन्नतमार्ग प्रकल्प हा मुंबई पारबंदर प्रकल्पाच्या वाहतूक विकिरण व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असून हा प्रकल्प वेळेत पूर्ण होणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, प्राधिकरणाच्या दि. २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेल्या १४७ व्या बैठकीत सदरच्या पुलाच्या रु. १२७६ कोटी इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे सदर प्रकल्पास महाराष्ट्र सागरी किनारा व्यवस्थापन प्राधिकरण (Maharashtra Coastal Zone Management Authority) यांच्या दि. ७ जुलै, २०२० रोजी झालेल्या १४९ व्या बैठकीत व राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) यांच्या दि. ८ सप्टेंबर २०२० रोजी झालेल्या २०५ व्या बैठकीत सागरी किनारा नियमन विषयक मान्यता (Coastal Regulation Zone (CRZ) clearance) प्राप्त झालेली असल्याचे सांगितले.

३.२ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असेही नमूद केले की, या प्रकल्पाकरीता मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची रु. १०५१,८६,३९,६९०/- (रुपये एक हजार एक्कावन्न कोटी शहाऐंशी लाख एकोणचाळीस हजार सहाशे नव्वद) किंमतीची निविदा स्विकारण्यास आणि मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांची प्रकल्पाच्या बांधकामाकरीता नियुक्ती करण्यास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक ३० एप्रिल, २०२० रोजी झालेल्या २६५ व्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली. त्या अनुषंगाने मे. जे. कुमार इन्फ्राप्रोजेक्ट्स लि. यांना दि. १३ जानेवारी, २०२१ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत.

३.३ महानगर आयुक्त यांनी या प्रकल्पाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या (Project Management Concultant – [PMC]) नियुक्तीसाठी यापूर्वी मागविण्यात आलेल्या निविदांबाबतची माहिती दिली तसेच दि. २४ सप्टेंबर २०१९ रोजी प्राधिकरणाने तयार केलेल्या

सल्लागारांच्या निवडसूचीमधून (Empanelled Consultants) निविदा मागविण्यात आल्या. सदर निविदा प्रपत्रांतील अर्हता व पात्रता निकष बाबी पूर्तता करणारी फक्त १ निविदा प्राप्त झाल्याने प्राधिकरणाच्या निविदा स्विकृती समितीने (Tender Acceptance Committee) सुचविल्यानुसार सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आल्याचे सांगितले. तसेच, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नियुक्तीसाठी दि. २२ जून, २०२० रोजी सल्लागारांकडून गुणवत्ता-किंमतीवर आधारित निवड पद्धतीने (Quaility-Cost Based Selection - QCBS) खुल्या निविदा मागविण्यात आल्या. सदर दुसऱ्या निविदा प्रक्रियेमध्ये तीन सल्लागारांकडून निविदा प्राप्त झाल्या. त्यापैकी मे.अेईकॉम इंडिया प्रा. लि. व मे. टिपीएफ लि. यांचेकडून प्राप्त झालेल्या निविदा स्वक्षमतेवर पात्रता निकषांतील तरतूदींची पूर्तता न करणाऱ्या होत्या. स्वक्षमतेवर पात्रता निकषांतील तरतूदींची पूर्तता करणारी एकच निविदा प्राप्त झाल्याने प्राधिकरणाच्या निविदा स्विकृती समितीच्या सूचनेनुसार तसेच दि. १२ एप्रिल, २०१७ च्या शासन निर्णयानुसार सदर निविदा प्रक्रिया रद्द करण्यात आल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले.

३.४ अतिरिक्त महानगर आयुक्त (२) यांनी असेही नमूद केले की, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराच्या नियुक्तीसाठी गुणवत्ता-किंमती वर आधारित निवड पद्धतीस (Quality-Cost Based Selection) अनुसरून दि. १० ऑक्टोबर, २०२० रोजी तिसऱ्यांदा फेर-निविदा काढण्यात आली. सदरच्या प्रकल्पामध्ये असलेली विविध तांत्रिक आव्हाने विचारात घेऊन तांत्रिक गुणांकनाचे निकष निविदेमध्ये अंर्तभूत करण्यात आले.

३.५ निविदाकारांकडून प्राप्त ई-देकारातील लिफाफा-अ दि. २६ नोव्हेंबर २०२० रोजी उघडण्यात आले. खालीलप्रमाणे २ निविदाकार त्यांचे ई-निविदा लिफाफा-ब उघडण्यास पात्र ठरले;

१. मे.स्टुप कंन्सलटंट्स प्रा. लि.

२. मे. टेक्नोजेम कंन्सलटंट्स प्रा. लि.

उपरोक्त निविदा प्रक्रियेमध्ये मे. एईकॉम एशिया कंपनी लि. यांनीही भाग घेतला होता. परंतु ई-निविदा प्रक्रिया (Online Control transfer) पूर्ण न केल्यामुळे ते निविदा प्रक्रियेसाठी अपात्र ठरले. निविदेतील तरतूदींनुसार केलेल्या तांत्रिक छाननीअंती मे.स्टुप कंन्सलटंट प्रा. लि. व मे. टेक्नोजेम कंन्सलटंट प्रा. लि. यांना अनुक्रमे ९१.१६ आणि ७८.६३ तांत्रिक गुण प्राप्त झाले.

सदर तांत्रिक गुणांकनास निविदा स्विकृती समितीची मान्यता मिळाल्यानंतर मे.स्टुप कंन्सलटंट्स प्रा. लि. व मे. टेक्नोजेम कंन्सलटंट्स प्रा. लि. यांचे आर्थिक देकार उघडण्यात आले. तांत्रिक-आर्थिक गुणांसाठी ८०% - २०% भारांक या निविदेतील तरतूदींनुसार मे.स्टुप कंन्सलटंट प्रा. लि. व मे. टेक्नोजेम कंन्सलटंट प्रा. लि. यांचे संयुक्तपणे तांत्रिक व वित्तिय गुणांकन खालीलप्रमाणे आहेत.

| बाब | कमाल गुण | प्राप्त गुण | |
|---|---|---|---|
| | | मे.स्टुप कंन्सलटंट्स प्रा. लि. | मे. टेक्नोजेम कंन्सलटंट्स प्रा. लि. |
| तांत्रिक गुण | १०० | **९१.१६** | **७८.६३** |
| वित्तिय निविदा | | **११,७७,२३,०२०/-** | **१९,९८,५३,४००/-** |
| आर्थिक गुण | १०० | १००.०० | ५८.९० |
| ०.८ x तांत्रिक गुण | | ७२.९३ | ६२.९० |
| ०.२ x आर्थिक गुण | | २०.०० | ११.७८ |
| **संयुक्त तांत्रिक + आर्थिक गुण** | | **९२.९३** | **७४.६८** |
| | | **कमाल संयुक्त गुण** | |

३.६ वरीलप्रमाणे कमाल संयुक्त गुण प्राप्त केलेल्या मे. स्टुप कंन्सलटंट्स प्रा. लि यांचा रु. ११,७७,२३,०२० (रुपये अकरा कोटी सत्त्याहत्तर लाख तेवीस हजार वीस फक्त) किंमतीचा आर्थिक देकार नमूद बांधकामाच्या किंमतीच्या १.२५% इतका आढळून आल्याचे नमूद केले. महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, निविदा स्विकृती समितीच्या दि. ४ जानेवारी २०२१ रोजी झालेल्या बैठकीत याबाबत चर्चा करून समितीने मे. स्टुप कंन्सलटंट्स प्रा. लि. यांच्या रु. ११,७७,२३,०२०/- (कर वगळून) इतक्या रक्कमेची निविदा, निविदेतील अटी व शर्तीची पूर्तता करणारी असल्याने कार्यकारी समितीकडे स्वीकृतीसाठी पाठविण्याची शिफारस केली. त्यानुसार पुढीलप्रमाणे प्रस्ताव प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४०१ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन

कार्यकारी समिती याव्दारे शिवडी ते वरळी या उन्नत मार्गाच्या प्रस्तावित कामासाठी मे. स्टुप कंन्सलटंट्स प्रा. लि., यांचा रु. ११,७७,२३,०२०/- (कर वगळून) (रुपये अकरा कोटी सत्त्याहत्तर लाख तेवीस हजार वीस) देकार स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कंत्राटातील तरतूदींनुसार संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** प्रकल्पाकरीता कंत्राटदाराची नियुक्ती झाली असल्याने आणि प्रकल्पीय व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती होणे आवश्यक असल्याने, कार्यकारी समिती याव्दारे मे. स्टुप कंन्सलटंट्स प्रा. लि. यांची नियुक्ती करणेकरीता आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करण्याच्या प्रस्तावास मान्यता देत आहे.

**"आणखी असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ४ : मेट्रो मार्ग ४ आणि विस्तारीत कॉरिडॉर ( वडाळा- कासारवडवली- गायमुख ) करीता २३४ मानक गेज गाडी ( standard gauge car ) ची रचना, उत्पादन पुरवठा, चाचणी व कार्यान्वयन करणे आणि प्रशिक्षण देणे.**

४.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एमआरडी-३३१६/प्र.क्र.४१/नवि-७ दिनांक २५ ऑक्टोबर,२०१६ अन्वये मेट्रो मार्ग-४ आणि महाराष्ट्र शासन निर्णय क्र.एमआरडी-३३१८/प्र.क्र.५७/ नवि-७, दिनांक २५ जानेवारी, २०१९ अन्वये मेट्रो मार्ग-४-अ ला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. प्रणाली घटकांचे व एमएमआय चे कामांना केएफडब्ल्यू डेव्हलपमेंट बँक, जर्मनी यांचे कडून कर्ज करारानुसार दिनांक ५ नोव्हेंबर, २०२० द्वारा अनुदानित केले आहेत. प्रणालीच्या कामांकरिता अंदाजपत्रके व मसुदा निविदा प्रधिकरणाच्या मेट्रो विभागाने केएफडब्ल्यू च्या "खरेदी मार्गदर्शक तत्वांवर " करून घेतल्या होत्या.

४.२ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, वरील मेट्रो मार्गाच्या प्रणाली कामाच्या अंमलबजावणीकरीता ई-निविदा मागविण्यासाठी "लोकमत" तसेच "हिंदुस्थान टाईम्स" वृत्तपत्रात दिनांक २० डिसेंबर, २०१९ रोजी ई-निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली. प्रचलित पध्दतीनुसार दिनांक २१ जानेवारी,२०२० ला निविदा पूर्व बैठक घेवून उपस्थित केलेल्या बाबींचे स्पष्टीकरण व

इतिवृत्त प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख २८ मे, २०२० होती. ४ ई-निविदा प्रस्ताव प्राप्त झाले. दिनांक २९ मे, २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता लिफाफा 'अ' (निविदा किंमत) व दिनांक १३ जुलै,२०२० रोजी ११ वाजता लिफाफा 'ब' (तांत्रिक प्रस्ताव) उघडण्यात आले, ज्यामध्ये खालील निविदाकारांनी ई-निविदा प्रस्ताव सादर केले :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १ | M/s Bharat Earth Movers Limited |
| २ | Consortium of M/s. Bombardier Transportation India Private Limited and M/s. Bombardier Transportation GmBH |
| ३ | M/s. CRRC Nanjing Puzhen Co. Ltd. |

४.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, साधारण सल्लागारांनी तांत्रिक मूल्यमापन करून अहवाल सादर केले. भाग १, सेक्शन ३ – मूल्यमापन आणि पात्रता निकषांच्या आवश्यकतानुसार तांत्रिक प्रस्तावाचे मूल्यमापन करण्यात आले आहेत. साधारण सल्लागाराचा तांत्रिक मुल्यमापन अहवाल आणि प्रस्ताव मुल्यमापन समितीच्या अहवालास सक्षम प्रधिकरणाची मान्यता मिळाली आणि केएफडब्ल्यू बँकेकडून "ना हरकत प्रमाणपत्र " प्राप्त झाल्यावर निविदा क्र.- CA-७१/MRS२ करीता खालील दोन (०२) निविदा पात्र ठरल्या आहेत :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नाव |
|---|---|
| १. | Consortium of M/s. Bombardier Transportation India Private Limited and M/s. Bombardier Transportation GmBH |
| २. | M/s. Bharat Earth Movers Limited |

४.४ महानगर आयुक्त यांनी पूढे असे सांगितले की, प्रस्ताव मुल्यमापन समितीच्या अहवालास सक्षम प्रधिकरणाच्या मान्यतेने दोन पात्र निविदाकारांचे लिफाफा "क" (आर्थिक प्रस्ताव) दिनांक १६ जानेवारी,२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता ई-निविदाकारांच्या प्रतिनिधी समक्ष उघडण्यात आले. तांत्रिकदृष्टया पात्र अशा दोन निविदांच्या तुलनात्मक मुल्यांकनासाठी,भाग १ सेक्शन ३ कलम ४.२.४.१, नुसार सुधारित "Total Bid Lump Sum Price" भारतीय चलन (रूपये) मध्ये मानले जातील व ITB ३९.२ नुसार सर्वात कमी मूल्यांकन

केलेल्या किंमतीची किंमत ( Lower Evaluated Bid Price) निश्चित करण्यात येईल. सुधारित प्रस्ताव किंमत खालील प्रमाणे आहे :-

| अ. क्र. | निविदाकारांचे नाव | युरो घटक | SEK/JPY घटक | रूपये घटक | एकुण ( Total Bid Lump Sum Price समतुल्य रूपये ) |
|---|---|---|---|---|---|
| १. | Consortium of M/s. Bombardier Transportation India Private Limited and M/s. Bombardier Transportation GmBH | ७२,७२८,२३० | ८२,२०१,५०० (SEK) | ११,९७४,१७५,११६ | १८,५४२,०९८,८३८ |
| २. | M/s. Bharat Earth Movers Limited | ७०,९२७,६७४ | ७,११८,७१५,८०९ (JPY) | ८,६२२,२६१,८५२ | १९,४२८,४३६,७२३ |

आर्थिक प्रस्तावाची तुलनात्मक विधान खालील प्रमाणे आहे.

| Sr. No. | Bidder's Name | Total Evaluated Bid Price (INR) | Bid Order | Percentage w.r.t. Estimated Cost |
|---|---|---|---|---|
| 1 | Consortium of M/s Bombardier Transportation India Private Limited & M/s Bombardier Transportation GmbH | 18,542,098,838 | L1 | - 0.58 |
| 2 | M/s Bharat Earth Movers Limited | 19,428,436,723 | L2 | + 4.17 |

Consortium of M/s Bombardier Transportation India Private Limited & M/s Bombardier Transportation GmbH यांचा रू.१८,५४२,०९८,८३८ एवढ्या किंमतीचा देकार आहे व ती सर्वात कमी मूल्यांकन बोलीचा आहे.

४.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, आर्थिक मूल्यमापन अहवाल प्रस्ताव मूल्यमापन समितीपुढे मान्यतेसाठी दिनांक २८ जानेवारी २०२१, रोजी सादर करण्यात आला. प्रस्ताव मूल्यमापन समितीनुसार L-१ निविदा प्रस्ताव **Consortium of M/s Bombardier Transportation India Private Limited & M/s Bombardier Transportation GmbH** यांची निश्चित लंप्सम एकूण किंमत **EURO ७२,७२८,२३० व**

**SEK ८२,२०१,५०० व INR ११,९७४,१७५,११६** ही निविदा स्विकारण्यास शिफारस केली आहे. केएफडब्ल्यू डेव्हलपमेंट बँक, जर्मनीने ०८ फेब्रुवारी २०२१ रोजीच्या आर्थिक मूल्यमापन अहवालावर ईमेलद्वारे 'ना हरकत प्रमाणपत्र' दिले आहे.

४.६ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, मेट्रो लाईन २A व ७ साठी दोन वर्षांपूर्वी अंतिम करण्यात आलेल्या किंमतीपेक्षा ही किंमत कमी आहे.तसेच मेट्रो लाईन-३ साठी MMRCL ने दोन वर्षापूर्वी अंतिम केलेल्या किंमतीपेक्षाही ही किंमत कमी आहे. त्यामुळे MMRDA चा फायदा झालेला आहे. संपूर्ण निविदा प्रक्रियेवर कार्यकारी समिती समाधानी होते आणि असे नमुद केले की निविदा प्रक्रिया पारदर्शक होती व स्पर्धात्मक दर मिळविण्यात आले आहेत.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४०२ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे L-१ निविदा प्रस्ताव **Consortium of M/s Bombardier Transportation India Private Limited & M/s Bombardier Transportation GmbH** यांचा **EURO ७२,७२८,२३० व SEK ८२,२०१,५०० व INR ११,९७४,१७५,११६** एवढया किंमतीचा देकार स्विकारण्यास व नियुक्ती करण्यास तसेच त्या अनुषंगाने करारनाम्यातील होणाऱ्या संभाव्य अर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ५ : मुंबई महानगर प्रदेश एकात्मिक तिकीटीकरण पध्दतीची अंमलबजावणी करण्याकरीता मे. भारतीय स्टेट बँक (SBI) यांची बँकींग पार्टनर म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देण्याबाबत.**

५.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, दिनांक ०७ जुलै, २०२० रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १४९ व्या बैठकीत प्राधिकरण राबवित असलेल्या मेट्रोचे काम पूर्ण होत असल्याने व नागरिकांच्या सोईसाठी मुंबई महानगर प्रदेशात एकात्मिक तिकिटीकरण पध्दतीची अंमलबजावणी करण्याची निकड लक्षात घेता खालील नमुद बाबींना मान्यता देण्यात आली आहे :-

**अ) एकात्मिक तिकिटीकरण पध्दतीची अंमलबजावणी करण्यास मान्यता:-**

१. M/s. Pricewaterhouse Coopers Pvt. Ltd, India यांच्यामार्फत प्राधिकरणास पुरविण्यात येणारी एकात्मिक तिकीटीकरण प्रणाली (ITS) विषयक सल्लागार सेवा पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

२. मुंबई महानगर प्रदेशामध्ये सर्व सार्वजनिक परिवहन संस्थेकरीता प्रवाशांना एकात्मिक तिकिटीकरण सुविधा प्रदान करण्यासाठी तसेच भविष्यात प्रवासी भाडे धोरणांना अनुकूल धोरण तयार करण्यासाठी सल्लागारामार्फत एक समानस्तर निर्माण करण्यास मान्यता देत आहे. तसेच ही योजना एकापेक्षा जास्त टप्प्यामध्ये राबविण्यास व केंद्र शासनाच्या योजनेस कालांतराने समायोजित करणे.

**ब) मुंबई महानगर प्रदेशात एकात्मिक मोबाईल ॲपचा वापर व बँकिग संस्थेची नियुक्ती :**

सार्वजनिक परिवहन सेवेकरीता अनिर्बंध प्रवासाचा (seamless travel) आराखडा तयार करुन मोबाईल ॲपद्वारे आरक्षण व्यवस्था सक्षम करण्यास मान्यता व त्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन ॲपसाठी (Technology Partner) ची नेमणूक करणे.

सदर प्रकल्पाकरीता प्राधिकरणास वित्तीय संस्थेची (अधिग्रहन / कार्ड जारी बँक) (Acquirer / Issuer Bank) निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण करुन Banking Partner ची नेमणूक करणे.

..११/-

५.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, बँकिंग संस्था (Banking Partner) ची नियुक्ती करण्यासाठी प्राधिकरणामार्फत ई-निविदा दिनांक २४ जुलै, २०२० रोजी ई-निविदा संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आली. दिनांक ०५ ऑगस्ट, २०२० रोजी निविदा पूर्व बैठक घेण्यात आली. निविदा पूर्व बैठकीत व तद्नंतर उपस्थित केलेल्या प्रश्नांचे/मुद्दयांचे स्पष्टीकरण प्राधिकरणाच्या ई-निविदा संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आले होते. ई-निविदा प्रस्ताव सादर करण्याची अंतिम दिनांक १६ ऑक्टोबर, २०२० पर्यंत होती. त्यानुसार दिनांक १९ ऑक्टोबर, २०२० रोजी लिफाफा "अ" (निविदा किंमत) व (तांत्रिक प्रस्ताव) प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतर उघडण्यात आले. निविदा प्रस्ताव सादर केलेल्या निविदाकारांचा तपशील पुढील प्रमाणे आहे:

१. एच.डी.एफ.सी. बँक लिमिटेड
२. स्टेट बँक ऑफ इंडिया
३. आयसीआयसीआय बँक प्रायव्हेट लिमिटेड

५.३ महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, अतिरिक्त महानगर आयुक्त (१) यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे निविदा तपासणी/मुल्यांकन समिती स्थापन करण्यात आली :-

| | | |
|---|---|---|
| १. | अतिरिक्त महानगर आयुक्त १ | अध्यक्ष |
| २. | संचालक (प्रणाली एकात्मिकरण) | सदस्य |
| ३. | संचालक (प्रकल्प) मेट्रो अंमलबजावणी शाखा | सदस्य |
| ४. | वित्तीय सल्लागार, वित्त व लेखा विभाग | सदस्य |
| ५. | प्रमुख, नगर व क्षेत्र नियोजन विभाग | सदस्य |
| ६. | प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग | सदस्य सचिव |

तद्नंतर, निविदा तपासणी / मुल्यांकन समितीने प्राप्त झालेल्या निविदांची तांत्रिक छाननी केली. सदर अहवालानुसार तीन ही निविदाकार तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरविण्यात आले होते आणि त्यांचे वित्तीय लिफाफे उघडण्यास शिफारस करण्यात आली होती.

निविदाकारांचे निविदा लिफाफे दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी उघडण्यात आले सदर निविदांची वित्तिय प्रस्तावाची माहिती खालील प्रमाणे आहे :-

| अ.क्र. | निविदाकारांचे नावे | आर्थिक प्रस्ताव (Financial Quote) | | शेरा |
|---|---|---|---|---|
| | | घटक (Component) | निविदाकाराद्वारे आकारण्यात येणाऱ्या प्रत्येक व्यवहाराची किंमत (व्यवहार मूल्याच्या%) (अ १) [Cost per transaction to be levied by bidder (% of transaction value) (A1)] | |
| | | व्यवहार मूल्याच्या % म्हणून निविदाकाराद्वारे आकारले जाणारे शुल्क आकडेवारी- मध्ये, जसे __.__% [Charge to be levied by bidder as a % of the transaction value [in figures, such as __.__%] | शब्दान्वये [In Words] | |
| १ | एचडीएफसी बँक लि. | २.०० | दोन टक्के | L२ |
| २ | आयसीआयसीआय बँक प्रा. लि. | ८.०० | आठ टक्के | L३ |
| ३ | स्टेट बँक ऑफ इंडिया (भारतीय स्टेट बँक) | **१.६०** | **एक पूर्णांक सहा टक्के** | **L१ (लघुत्तम निवदाकार)** |

५.४ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, निविदा तपासणी / मूल्यांकन समितीने शिफारस केल्याप्रमाणे लघुत्तम निविदाकार मे. भारतीय स्टेट बँक (SBI) यांना बँकिंग भागीदार (Banking Partner) म्हणून नेमणूक करणे प्रस्तावित आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४०३ :**

**"असा ठराव करण्यात येतो की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे मे. भारतीय स्टेट बँक (SBI) यांची बँकिंग भागीदार (Banking Partner) म्हणून व्यवहार मुल्याच्या १.६०% इतक्या आकारण्यात येणाऱ्या शुल्कावर नेमणूक करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ६ : <u>मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील संचालक (प्रणाली) या पदावरील नेमणूकीस मान्यता देणेबाबत</u>**

६.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशात एकूण ११८ कि.मी. उन्नत मेट्रो मार्ग अग्रक्रमाने राबविण्यासाठी आवश्यकता असलेल्या तांत्रिक व अतांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता विचारात घेता प्राधिकरणाच्या दिनांक १९ ऑक्टोबर, २०१६ रोजी झालेल्या १४१व्या बैठकीत ठराव क्र.१३८२ अन्वये सदर प्रकल्पाकरीता प्राधिकरणाच्या आस्थापनेवर तांत्रिक संवर्गात नव्याने पदे निर्माण करण्यात आली आहेत. यापैकी "संचालक (प्रणाली)" वेतन मॅट्रीक्स एस-३० : रु.१४४२००-२१८२०० या पदावरील नेमणूकीसाठी कार्यकारी समितीच्या २५६व्या बैठकीतील ठराव क्रमांक १३४३ अन्वये महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

६.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, संचालक (प्रणाली)" (वेतन मॅट्रीक्स एस-३० : रु.१४४२००-२१८२००) हे वरिष्ठ वेतनश्रेणीतील विभाग प्रमुख दर्जाचे पद असल्याने प्राधिकरणाचे नियुक्ती प्राधिकारी या नात्याने सदर पदावर नेमणूकीकरिता कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधिन राहून खालीलप्रमाणे निवड समिती गठित करण्यात आली आहे :-

| | |
|---|---|
| महानगर आयुक्त | अध्यक्ष |
| अतिरिक्त महानगर आयुक्त (१) व प्रकल्प संचालक | सदस्य |
| श्री.डी.के.शर्मा, व्यवस्थापकीय संचालक,<br>महा मुंबई मेट्रो संचलन महामंडळ लिमिटेड | तज्ञ सदस्य |
| श्री.अभय मिश्रा, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुंबई मेट्रो वन प्रायव्हेट लिमिटेड | तज्ञ सदस्य |
| श्री.पी.एम.यादव, अति.प्रमुख (नगर रचना)<br>(मागासवर्गीयांचे प्रतिनिधी) | सदस्य |
| सह महानगर आयुक्त | सदस्य सचिव |

..१४/-

६.३ महानगर आयुक्त यांनी पुढे असे सांगितले की, उपरोक्त निवड समितीने "संचालक (प्रणाली)" (वेतन मॅट्रीक्स एस-३० : रु.१४४२००-२१८२००) या पदाच्या मुलाखतीकरीता पात्र ठरविण्यात आलेल्या उमेदवारांच्या मुलाखती घेतल्या. त्यानुसार शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव, पात्रता व योग्यता या सर्व बाबींचा विचार करुन एकमताने "संचालक (प्रणाली)" (वेतन मॅट्रीक्स एस-३० : रु.१४४२००-२१८२००) या पदावर श्री. राजीव अग्रवाल, सेवानिवृत्त महाव्यवस्थापक, उत्तर पूर्वीय रेल्वे, गोरखपूर यांची सरळसेवेने नेमणूक करण्याची शिफारस केली. "संचालक (प्रणाली)" (वेतन मॅट्रीक्स एस-३० : रु.१४४२००-२१८२००) हे पद विभाग प्रमुख व त्यावरील दर्जाचे असल्याने सदर पदावर नेमणूक करण्याचे अधिकार कार्यकारी समितीला आहेत.

६.४ उपरोक्त निवड समितीने श्री. राजीव अग्रवाल यांची संचालक (प्रणाली) या पदावर सरळसेवेने नेमणूक करण्यास शिफारस केली. त्यानुसार श्री. राजीव अग्रवाल यांची संचालक (प्रणाली) या पदावर कार्यकारी समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून नेमणूक करण्यात आली. तरी कार्यकारी समितीस विनंती की, उपरोक्त नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देण्यात यावी.

६.५ कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन पुढील ठराव मंजूर केला :-

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४०४ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याद्वारे "संचालक (प्रणाली)" (वेतन मॅट्रीक्स एस-३० : रु.१४४२००-२१८२००) या पदावर श्री. राजीव अग्रवाल, सेवानिवृत्त महाव्यवस्थापक, उत्तर पूर्वीय रेल्वे, गोरखपूर यांची सरळसेवेने नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. संचालक (प्रणाली) या पदावर नेमणूक करणेकरीता गठीत करण्यात आलेल्या निवड समितीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावरील नेमणूकीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

७.१ महानगर आयुक्त यांनी यासंदर्भात असे सांगितले की, प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग हे एस-२९ रु.१,३१,१००-२,१६,६०० या वेतनश्रेणीतील रिक्त असलेले पद भरण्याच्या दृष्टीने दिनांक ९.६.१९९७ रोजीचे सेवाप्रवेश नियम जसेच्या तसे ठेवून दिनांक १६ जुलै, २०२० रोजी जाहिरात प्रकाशित करण्यात आली होती. सदर जाहिरातीस अनुलक्षून १५ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी प्रमुख, परिवहन व दळणवळण विभागाच्या सेवाप्रवेश नियमानुसार एकूण ४ उमेदवार मुलाखतीस पात्र ठरले होते.

७.२ प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग हे पद सरळसेवेने भरण्याकरीता कार्यालयीन आदेश क्र.प्र/आस्था-१५/४४५/२०२०, दिनांक १३ फेब्रुवारी, २०२० अन्वये महानगर आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली खालील निवड समिती गठीत करण्यात आली होती :-

| अ.क्र. | निवड समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १. | महानगर आयुक्त | अध्यक्ष |
| २. | अतिरिक्त महानगर आयुक्त (१) | सदस्य |
| ३. | श्री.ओ.पी.अग्रवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी, जागतिक संशोधन संस्था (WRI) | सदस्य |
| ४. | प्रा.कृष्णा राव, भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT), मुंबई | सदस्य |
| ५. | सह महानगर आयुक्त | सदस्य |
| ६. | वित्तीय सल्लागार | सदस्य |
| ७. | श्री.पी.एम.यादव, अति.प्रमुख (नगर रचना) मागासवर्गीय प्रतिनिधी. | सदस्य |

७.३ प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग यां पदाकरीता पात्र ठरलेल्या ४ उमेदवारांना दिनांक २२ डिसेंबर, २०२० रोजी मुलाखतीकरीता बोलाविण्यात आले होते. परंतु ३ उमेदवार हजर राहिले. उपरोक्त निवड समितीने शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव व पात्रतेच्या आधारे एकमताने डॉ.कोलीसेटटी व्यंकटा गणेश बाबु यांची प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदाकरीता शिफारस केली. डॉ.कोलीसेटटी व्यंकटा गणेश बाबु यांची दूरचित्र संवादाद्वारे (Video Conferencing) मुलाखत घेतली असल्यामुळे त्यांच्या मुळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात आलेली नाही. तरी, डॉ.कोलीसेटटी व्यंकटा गणेश बाबु यांची शैक्षणिक अर्हता, जन्म दिनांक, अनुभव प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र, ना हरकत प्रमाणपत्र इत्यादी मूळ कागदपत्रांची

पडताळणी करण्याच्या अधीन राहून एस-२९ : रु.१,३१,१००-२,१६,६०० या वेतनश्रेणीतील प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग या पदावर निवड करण्याची निवड समितीने शिफारस केली आहे व त्यानुसार नियुक्तीचे देकारपत्र निर्गमित करण्यात आले आहे.

७.४ उपरोक्त नियुक्तीस कार्यकारी समितीने कृपया कार्योत्तर मंजूरी प्रदान करावी.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४०५ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (एक) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करुन डॉ.कोलीसेटटी व्यंकटा गणेश बाबु यांची शैक्षणिक अर्हता,जन्म दिनांक, अनुभव प्रमाणपत्र, लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र, ना हरकत प्रमाणपत्र इत्यादी मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्याच्या अधीन राहून वेतन मॅट्रीक्स एस-२९ : रु.१,३१,१००-२,१६,६०० या वेतनश्रेणीतील **प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग** या पदावरील नेमणूकीस कार्योत्तर मंजूरी देत आहे.

"**आणखी असा ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्याकरीता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**बाब क्र. ८ : शिळफाटा व कल्याणफाटा जंक्शन येथे प्रस्तावित उड्डाणपूलांच्या बांधकामाकरीता तसेच कल्याण फाटा येथील भुयारी मार्गाच्या बांधकामाच्या लघुत्तम निविदेस मान्यता मिळणेबाबत.**

८.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देतांना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, जुना राष्ट्रीय महामार्ग क्र.४ वरील शिळफाटा, कल्याणफाटा तसेच MIDC पाईप लाईन रस्त्याच्या महापेकडील जंक्शन ही ठिकाणे अत्यंत गजबजलेले असून महामार्गावरील वाहतूक गेल्या काही वर्षांपासून प्रचंड प्रमाणात वाढलेली आहे. या महामार्गावर प्रामुख्याने जवाहरलाल नेहरू बंदराकडून तसेच पुणे-हैदराबाद या दिशेकडून अहमदाबाद-गुजरात या दिशेकडे जड वाहतूक ये-जा होतांना दिसून येते. तसेच कल्याण-डोंबिवली-बदलापूर या दिशेकडून कल्याण फाटा ते MIDC पाईप लाईन रोड या दिशेकडे दररोज सकाळ व संध्याकाळ प्रचंड वाहतूक होताना

दिसून येते. यामुळे वरील दोन्ही जंक्शनवर रात्रंदिवस वाहतुकीची कोंडी आढळून येते. या जंक्शनवर प्रस्तावित उड्डाणपूलांच्या कामाकरीता भौगोलिक सर्वेक्षण, वाहतुकीचा अभ्यास करणे, संकल्प चित्र तयार करणे व अंदाज पत्रके बनविणे इ. कामांसाठी मे. स्टुप कंन्सलटंट प्रा. लि. यांना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमण्यात आले आहे. दि.२६.०३.२०१५ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १३७ व्या बैठकीत जुन्या राष्ट्रीय महामार्गाच्या रस्त्याचे ठाणे महानगरपालिका यांच्या विकास आराखड्यात दर्शविल्याप्रमाणे अस्तित्वातील ३० मीटर रस्त्याचे रूंदीकरण ६० मीटर इतके करणे तसेच शिळफाटा ते कल्याणफाटा जंक्शन पर्यंत उड्डाणपूल बांधणे या बांधकामांकरीता अंदाजित खर्च रक्कम रू. २८६ कोटीस सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर रस्त्यामध्ये असलेल्या उच्च दाबाच्या तीन वीजवाहीन्या स्थलांतरीत केल्यानंतर तसेच रस्त्याचे रूंदीकरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर शिळफाटा ते कल्याणफाटा (१.५० कि.मी.) या दोन्ही जंक्शनवरील एकत्रित उड्डाणपूलाचे बांधकाम घेण्याचे ठरले. यानुसार पहिल्या टप्प्यात रस्त्याच्या रूंदीकरणाच्या कामाच्या निविदा मागवून सदर काम कंत्राटदारास रक्कम रू.६६.५९ कोटीस देण्यात आले. सदर ८०% काम पूर्ण झाले असून उर्वरित काम माहे ऑगस्ट, २०२१ अखेर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. तसेच रस्त्यांमधील उच्च व लघु दाबाच्या वीजवाहिन्या, ठाणे महानगरपालिकेच्या जलवाहिन्या स्थलांतरीत करण्याकरिता तसेच दरवाढ याकरिता एकूण रु. १०५.४३ कोटी इतका खर्च प्राधिकरणाने दिलेल्या प्रशासकीय मान्यतेच्या रक्कमेमधून करण्यात येत आहे.

८.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, कल्याणफाटा येथील श्री. दत्त मंदिराच्या जवळून बुलेट ट्रेन पहिल्या स्तरावरून जात असल्याने शिळफाटा ते कल्याणफाटा येथील उड्डाणपूलाचे काम मूळ नकाशाप्रमाणे हाती घेणे शक्य नाही. परंतु, दररोज होणाऱ्या वाहतुकीच्या कोंडीस चांगला पर्याय शोधण्याकरीता सल्लागारामार्फत पुन्हा सर्वेक्षण करण्यात आले. सल्लागाराने सुधारीत आराखड्यानुसार शिळफाटा जंक्शन येथे ७४० मी. लांबीचा स्वतंत्र ३+३ मार्गिकांचा उड्डाणपूल, कल्याण फाटा जंक्शन येथे १३६७ मी. लांबीचा डोंबिवलीच्या दिशेकडून MIDC पाईप लाईन रस्त्याकडे जाणारा एकदिशा मार्गिकेचा उड्डाणपूल, तसेच कल्याणफाटा जंक्शन येथे ६२५ मी. लांबीचा जड वाहतुकीसाठी ३+३ मार्गिकांचा भुयारी मार्ग प्रस्तावित केले. प्रस्तावित कामांमध्ये २ उड्डाणपूलांचे बांधकाम, १. भुयारी मार्ग, MIDC पाईप लाईन रोडचे रूंदीकरण व मजबूतीकरण करणे इ. कामांचा समावेश आहे. याशिवाय प्रकल्प क्षेत्राच्या हद्दीतून जात असलेल्या अंदाजे ३.५ कि.मी. इतक्या लांबीच्या १८००मि.मी. व्यासाच्या MIDC च्या

पाईप लाईन्सचे स्थलांतर करणे, अस्तित्वातील सर्व सेवा वाहिन्यांचे स्थलांतर करणे, प्रकल्प हद्दीतील झाडांचे स्थलांतर करणे इ. बाबींचा समावेश आहे. मूळ कामातील बदलांमुळे अंदाजपत्रकीय रक्कमेत रू.१२४ कोटींनी वाढ होऊन सुधारीत अंदाजपत्रकीय एकूण रक्कम रू.४१० कोटी इतकी आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि. ०७/०७/२०२० रोजी झालेल्या १४९ व्या बैठकीत शिळफाटा-कल्याण जंक्शन येथील प्रस्तावित उड्डाणपूलांच्या व भुयारी मार्गाच्या व अनुषंगाने करावयाच्या इतर बाबींच्या बांधकामांकरीता अंदाजित खर्च रक्कम रू.४१० कोटीस प्राधिकरणाने ठराव क्र.१५२६ द्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

८.३ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मे. स्टुप कन्सल्टंट प्रा. लि., या सल्लागाराने रक्कम रू.१,९५,२४,५२,८३०/- (वस्तु व सेवाकर वगळून) इतक्या अंदाजित किंमतीचे अंदाजपत्रक तयार करुन प्राधिकरणाने सदर कामाच्या निविदा मागविल्या. याकामाकरीता निविदा कत्रांटदाराच्या संकल्पनेवर व रस्त्याच्या कामाकरीता टक्केवारी दरावर निविदा मागविण्यात आली. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी ३० महिने (पावसाळ्यासहीत) इतका प्रस्तावित आहे.

८.४ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, टक्केवारी दराने (On Percentage Basis) ऑनलाईन ई-निविदा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर तसेच इंग्रजी व मराठी देश पातळीवरील दैनिक वृत्तपत्रांमध्ये दि. १५/०९/२०२० रोजी प्रसिध्द करण्यात आली. इच्छुक निविदाकारांसमवेत निविदापूर्व बैठक दि. २९/०९/२०२० रोजी घेण्यात आली व त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचा खुलासा व सामाईक बदल संच दि. १४/१०/२०२० रोजी प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. निविदाकारांचे ई-लिफाफा ‘अ’, पूर्व अर्हता आणि ई-लिफाफा ‘ब’, तांत्रिक प्रस्ताव दि. २९/१२/२०२० रोजी उघडण्यात आले. या देकारात मे. निरज सिमेंट स्ट्रक्चरल लि., मे. आरपीएस इन्फ्राप्रोजेक्ट प्रा. लि., मे. एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. व मे. एसपी सिंघला कंस्ट्रक्शन प्रा,लि. या चार निविदाकारांच्या निविदा प्राप्त झाल्या. सविस्तर निविदा सूचनेमध्ये विहित केलेल्या पात्रता निकषास अनुसरुन ई-लिफाफा ‘अ’ व ई-लिफाफा ‘ब’ मध्ये निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन निविदांचे तांत्रिक मुल्यांकन केले. या चारही निविदाकारांच्या निविदा सुसंवादी व निविदेतील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्याने अति.महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या "निविदा शिफारस समितीकडे" दि. १२/०२/२०२१ रोजीच्या बैठकीत प्राप्त निविदांचे तांत्रिक मुल्यांकन अहवाल सादर करण्यात आला. निविदा शिफारस समितीने त्यांचे आर्थिक देकार उघडण्याची

शिफारस केली. निविदाकारांचे ई-लिफाफा ‘क’ आर्थिक देकार असलेले दि.१२/०२/२०२१ रोजी उघडण्यात आले. प्राप्त देकारात मे. एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांचा रू.१,९१,१७,८३,२३७.५५ (वस्तु व सेवाकर वगळून) किंमतीचा आर्थिक देकार अंदाजित किंमतीच्या २.०८३% कमी दराने आहे.

८.५ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, सदर परिसरात मे. एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांची दोन कामे प्रगतीपथावर असून, सदर काम करण्यासाठी मनुष्यबळ व इतर यंत्र सामग्री व कास्टींग यार्डच्या जागेचे सेटअप त्यांचेकडे आहे. त्यामुळे त्यांना २.०८३% कमी दराने काम करणे शक्य आहे. मे. एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी दिलेल्या खुलाशास सल्लागार मे. स्टुप कन्संलटंट प्रा.लि. यांनी ठेकेदार मे. एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांनी निविदेत भरलेले दर हे वाजवी असून सदर काम ठेकेदार यशस्वीरित्या पूर्ण करु शकतील असे दि. १५/०२/२०२१ च्या पत्राद्वारे कळविले आहे निविदा शिफारस समितीने दि. १५/०२/२०२१ रोजी झालेल्या बैठकीत ठेकेदाराने कमी दराने भरलेल्या निविदेच्या रक्कमेबाबत ठेकेदाराने दिलेली कारणमिमांसा तसेच सल्लागाराने दिलेले पत्र यांचा विचार करुन सदर निविदा स्विकारण्याची शिफारस केली.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र. १४०६ :**

**“असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन कार्यकारी समिती याव्दारे राष्ट्रीय महामार्ग क्र.४ (जूना मुंबई - पुणे महामार्ग) वरील शिळफाटा व कल्याणफाटा जंक्शन येथे प्रस्तावित उड्डाणपूलांच्या बांधकामाकरीता तसेच कल्याण फाटा येथील भुयारी मार्गाचे बांधकाम या प्रस्तावित कामांसाठी मे. एसएमसी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि. यांची लघुत्तम निविदा रक्कम रु. १,९१,१७,८३,२३७.५५ (वस्तु व सेवाकर वगळून) ही अंदाजित रक्कम रु.१,९५,२४,५२,८३०/- पेक्षा रक्कम २.०८३% कमी दराने स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणारा अधिक निविदेनुसार देय भाववाढ संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र. ९ :** **महापौर निवासस्थानाच्या परिसरात मा.बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे संकल्पन, इंजिनिअरिंग, प्रोक्युरमेंट व बांधकाम करणे. टप्पा-१ अंतर्गत प्रवेशद्वार इमारत, आर्टिस्टसेंटर, कुंड इमारतीचे बांधकाम करणे व महापौर निवासस्थान इमारतीचा सांस्कृतिक ठेवा जतन करून या इमारतीचे संग्रहालयामध्ये रुपांतरीत करणे व सभोवतालच्या परिसराचे सुशोभिकरण करणे इत्यादी या कामाच्या निविदेनंतरच्या प्राप्त झालेल्या मे.टाटा प्रोजेक्टस लि., यांच्या लघुत्तम देकारास सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अधिन राहून मंजुरी मिळणेबाबत.**

९.१ सदर प्रस्तावाबाबत माहिती देतांना महानगर आयुक्त यांनी मा.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृती जपण्यासाठी मुंबई येथे बाळासाहेब ठाकरे यांचे भव्य स्मारक उभारण्याचा निर्णय शासनामार्फत घेतल्याचे सांगितले. त्याकरीता शासन निर्णय क्र. **स्मारक ३११४/मुंमस १४०/प्र.क्र.३७५/२९, दि. ०४ डिसेंबर २०१४** अन्वये पुढील कार्यवाहीसाठी शक्तीप्रदान समिती स्थापन करण्यात आली. शक्तीप्रदान समितीने शासनास केलेल्या अहवालानुसार स्मारकाकरिता मुंबईतील शिवाजी पार्क, दादर येथील महापौर बंगला जागेची शिफारस केली. तसेच स्मारकासाठी शासकीय सार्वजनिक न्यास स्थापन करावा अशी शिफारस केली. शासकीय सार्वजनिक न्यास व संस्था स्थापन करण्यास सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय यांचा शासन निर्णय क्र. **स्मारक ३११४/ मुमंस-१४०/प्र.क्र. ३७५/२९, दि. २७ सप्टेंबर, २०१६** अन्वये मान्यता देण्यात आली आहे. नगर विकास विभाग शासन निर्णय क्र. **एमआरडी-२०१८/प्र.क्र. १४७/नवि-०७, दि. २० फेब्रुवारी २०१९** अन्वये या कामाकरिता **रु. १०० कोटी** इतक्या रक्कमेच्या खर्चास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली व प्रस्तुत स्मारकाचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली. बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक न्यासाच्या **दि. ०१/०३/२०१९** च्या पत्रांनुसार मे. आभा नरेन लांबा असोसिएट्स या वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती करण्यात आली. सल्लागारामार्फत **रू. ८७.४६ कोटी** इतक्या रक्कमेचे अंदाजपत्रक प्राप्त झाले. त्याकरीता प्राधिकरणामार्फत **दि. १३/०२/२०१९** रोजी निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदर प्राप्त निविदा देकार हा **५४.५०%** ते **६०.९३%** इतक्या अधिक्य दराचा असल्यामुळे,

प्रस्तृत निविदा रद्द करण्यात आल्या. स्मारकाच्या बांधकामाकरिता महापौर निवासस्थान भूखंडालगतचा केरलीय समाज भुखंड भाडेतत्वावर बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून उपलब्ध झालेला असल्याने, दोन्ही भूखंडाच्या एकत्रितकरणाअंती स्मारकामधील प्रस्तावित इमारतींमध्ये वाढ झाल्याने तसेच इमारतीच्या आकारमानामध्ये व संकल्पनामध्ये बदल झाल्याने, स्मारकाच्या बांधकामाचे काम नव्याने हाती घेण्याबाबत न्यासाकडून प्राधिकरणास निर्देश प्राप्त झाले.

९.२ बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारक न्यासामार्फत या नवीन प्रकल्पाकरिता वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणूक विचारात घेऊन, न्यासाच्या कार्यकारी समितीपुढे प्रकल्पाच्या आराखडयाचे सादरीकरण करण्याबाबत इच्छुक निविदाकारांकडून देकार प्राप्त होण्यासाठी, न्यासामार्फत **दैनिक सामना व फ्री-प्रेस जर्नल** वृत्तपत्रात **दि. १२/०२/२०२०** रोजी जाहिरात देण्यात आली. जाहिरातीस अनुसरून दहा निविदाकारांचे प्रस्ताव प्राप्त होऊन, सादरीकरणाअंती ३ निविदाकारांची सूची अंतिम करण्यात आली. त्यापैकी मे. आभा नरेन लांबा असोसिएट्स या सल्लागाराचे सादरीकरण मान्य होऊन, न्यासामार्फत **दि. ०८/०६/२०२०** रोजीच्या पत्रान्वये मे. आभा नरेन लांबा असोसिएट्स या सल्लागाराची वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार पदी नेमणूक करण्याबाबत कार्यवाही हाती घेण्याकरिता व मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांच्या प्रचलित नियमानुसार व दरानुसार व्यावसायिक देयक अदायगीबाबत प्राधिकरणास निर्देशित करण्यात आले. सल्लागारामार्फत स्मारकासाठी आराखडे बनविण्यात आले व त्यास न्यासाकडून मंजूरी प्राप्त झाल्यावर, बांधकामाचे विस्तृत अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेस्तव प्राधिकरणास सादर करण्यात आले. स्मारक प्रकल्पातील इमारती निहाय अंतर्भूत कामे व सोयीसुविधा खालीलप्रमाणे :

- **महापौर निवासस्थानाची पुन:स्थापना व सुशोभिकरण करणे.**

  अस्तित्वातील महापौर निवासस्थान इमारतीचे क्षेत्रफळ अंदाजे ६०४ चौ.मी आहे.
  वारसा संवर्धन करण्यासाठी अंतर्गत व बाह्य भागाचे पुन:स्थापना करणे व गतवैभव प्राप्त होण्याकरीता नुतनीकरण व सौदंर्यकरण करणे.
  मा. बाळासाहेब ठाकरे यांचा जीवनपट उलघडणारी दृष्यचित्रे दर्शविणारी विविध कालखंडातील छायाचित्रे यांच्या संग्रहालयाकरीता या इमारतीमधील विविध खोल्यांचा वापर करण्यात येणार आहे.

- **आर्टीस्ट सेंटर इमारत बांधणे.**

  प्रस्तावित इमारत नविन बांधकामाच्या इमारत क्षेत्रफळ अंदाजे ५३५ चौ. मी. आहे. सदर इमारत आर.सी.सी पध्दतीची तळमजल्याची इमारत असुन, छत मंगलौरी कौल पध्दतीचे आधुनिक स्वरुपात बांधण्यात येणार आहे.

  कलाकार दालन इमारतीमध्ये कलाकारासाठी स्वतंत्र कक्ष, उपहारगृह व प्रसाधनगृह असणार आहे.

- **कुंड (इंटर प्रिटेशन) इमारत बांधणे.**

  सदर इमारत हि भुमिगत स्वरुपाची असुन, आर.सी.सी पध्दतीची आहे. इमारतीचे क्षेत्रफळ अंदाजे १०००.०० चौ.मी. आहे.

  भुमिगत कक्षाचा वरील भाग सभोवतालच्या जमिन सापेक्ष उणे दोन स्तरावर असुन, उर्ध्व भागात जल तलाव असणार आहे. भुमिगत कक्षाच्या भागात संग्राहालय, ग्रंथालय, आर्ट गॅलरी, कार्यालये, देखभाल / दुरुस्ती कक्ष व महिला / पुरुष अंपगासाठी व महिला / पुरुषांसाठी प्रसाधनगृह व जीन्याची सोय आहे.

  - **बागबगीचा तयार करणे:**

  भुखंडाच्या २.९० एकर जागेतुन महापौर निवासस्थान व इतर उपरोक्त संलग्न इमारती क्षेत्र वजा जाता, उर्वरीत भुखंडावर बागबगिचा तयार करून सुशोभिकरण करणे प्रस्तावित आहे.

  - **प्रवेशव्दार इमारत:**

  अभ्यागत कक्ष, मा.सचिव यांचे कार्यालय तसेच भुमीगत बहुउद्देशीय सभागृह व वाहनतळ यांची सोय आहे.

कामाची व्याप्ती लक्षात घेता, कामाचे अंदाजपत्रकाचे **टप्पा १ व २** असे वर्गीकरण करण्यात आलेले असून, सल्लागारामार्फत स्वतंत्र अंदाजपत्रके सादर करण्यात आलेली आहेत त्यातील कामांचा वाव खालीलप्रमाणे.

- **टप्पा १** मध्ये प्रकल्पातील इमारतींच्या बांधकामांचा समावेश असून, यात स्थापत्य, विद्युत, वातानुकुलित यंत्रणा उभारणी, इमारतीच्या अंतर्गत व बाहय सजावट, वाहनतळ उभारणी, बागबगिचा तयार करणे,

रेनवॉटर हार्वेस्टिंग इत्यादी कामांचा समावेश आहे व कामाची ढोबळ **अंदाजपत्रकीय किंमत रू. २५० कोटी** (वस्तु व सेवा कर व इतर करासहित) इतकी आहे.

- **टप्पा २** मध्ये Technology, Laser Show, Digital Mapping Projection, Narrative, Storey Telling, Film, Virtual Reality, Audio Visual and Technological Component For the Museum narrative इत्यादी कामांचा समावेश असून, इमारतीचे बांधकाम पुर्णत्वास येताना हाती घ्यावयाचे प्रस्तावित आहे. टप्पा २ मधील कामांसाठी ढोबळ **अंदाजपत्रकीय किंमत रू. १५० कोटी** (वस्तु व सेवा कर व इतर करासहित) इतकी आहे.

९.३ महानगर आयुक्त यांनी असे नमूद केले की, सद्यस्थितीत स्मारकाच्या बांधकामासाठी परिशिष्ठ क्र. ९.४ च्या शासन निर्णयान्वये)**रू. १०० कोटी** इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता यापूर्वीच प्राप्त झालेली असून, रु. ४०० कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता प्रदान होण्यासाठी, सुधारित प्रशासकीय मान्यतेबाबतचा प्रस्ताव नगर विकास विभागास प्राधिकरणामार्फत सादर करण्यात आलेला आहे. सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अधिन राहून, टप्पा १ नुसार स्मारकाच्या सर्व इमारती बांधकामाच्या कामासाठी व संलग्न कामासाठी रू. १८४.८७ कोटी (वस्तु व सेवा कर वगळून) इतक्या अंदाजित किंमतीचे अंदाजपत्रक तयार करून, मे. आभा नरेन लांबा असोसिएट्स यांनी प्राधिकरणास सादर केलेले आहे. महानगर आयुक्त यांचे मान्यतेने कामाच्या सुधारीत किंमतीबाबत स्पष्टीकरण देण्यात आले. केरलीय समाजाच्या **३६२.०४ चौ.मी.** भूखंड नव्याने उपलब्ध झालेला आहे. इमारतींची संख्या ४ वरुन ५ झाली आहे. इतर सोयी सुविधा मध्ये अतिरीक्त व्याख्यान सभागृह, बैठक कक्ष, रेनवॉटर हारवेस्टींग, पाण्याची टाकी, सर्व्हिस शाफ्ट, इलेक्ट्रीकल आणि सर्व्हीस रुम इत्यादीच्या क्षमतेमध्ये वाढ, वाहनतळ क्षमतेमध्ये वाढ, महापौर निवासस्थान सभोवतालच्या जागेचे भू:स्सखल्न प्रतिबंधक उपाययोजना, स्टेनलेस स्टील लोहसळया वापरणे व गंजप्रतिबंधक उपायोजना करणे, अत्याधुनिक वातानुकुलित यंत्रणा बसविणे, अतिवृष्टीमुळे तळघरामध्ये पाणी साचू नये व पाण्याचा विसर्ग योग्य पध्दतीने होण्याकरीता तळघराच्या सभोवतालच्या बाहय भिंती व खालील राफ्ट हया दोन स्तरामध्ये (Cavity Wall प्रकारात) बांधणे इ. मुळे कामांच्या किंमतीत वाढ झालेली आहे. अंदाजपत्रकातील दर हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्य दरसूची

..२४/-

सन २०२०-२१, बृन्हमुंबई महानगरपालिका दरसूची २०१८, नुसार विचारात घेतलेले असून, दरसूची बाहेरील कामांच्या विशेष बाबींसाठी बाजारभावाप्रमाणे विचारात घेऊन दर पृथ्थ:करण बनविण्यात आलेले आहे. तसेच या व्यतिरीक्त अंदाजपत्रकात कोविड – १९ च्या पार्श्वभूमीवर ५ प्रतिशत अधिक्य व रात्रीच्या कामासाठी ५ प्रतिशत अधिक्य दर यांचा अंतर्भाव आहे. या कामाकरिता निविदा कंत्राटदाराच्या संकल्पनेवर ईपीसी (Engineering Procurement and Construction) ई-निविदा (EPC e-Tender) मागविण्यात आलेली आहे. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी १४ महिने (पावसाळा कालावधी सहित) इतका प्रस्तावित आहे. सदर कामास महानगर आयुक्त यांच्या मान्यता घेऊन, ईपीसी ई- निविदा (EPC e-Tender) ऑनलाईन ई- निविदा प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर तसेच इंग्रजी व मराठी देश पातळीवरील दैनिक वृत्तपत्रामध्ये दि. २४/१०/२०२० रोजी टप्पा १ च्या बांधकामाच्या निविदा **दैनिक महाराष्ट्र टाईम्स व दैनिक हिन्दुस्तान टाईम्स** या वृत्तपत्रात प्रसिध्दीस देण्यात आल्या. निविदा डाऊनलोड कालावधी दि. ०५/११/२०२० ते दि. ०६/०१/२०२१ रोजी पर्यंत होता. इच्छुक निविदाकारांसमावेत निविदापूर्व बैठक दि. २७/११/२०२० रोजी घेण्यात आली व त्याने उपस्थितीत केलेल्या मुद्दयांचा व सामाईक बदल संच प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले. निविदा लिफाफा अ दि. ०७/०१/२०२१ रोजी उघडण्यात आला. मे. टाटा प्रोजेक्टस, मे. नागार्जुन कंन्स्ट्रक्शन कंपनी, मे. एल ॲण्ड टी कंपनी व मे. शापुरजी पालनजी ॲण्ड कंपनी या कंपनीचा निविदा देकार प्राप्त झालेला आहे. **लिफाफा – 'अ' मधील** निविदा फी व इसारा रक्कमेबाबतचे सर्व निकष सर्व निविदाकारांकडून पूर्ण झालेले असल्याने, दि.०७/०१/२०२१ रोजी सर्व निविदा देकारांचा **लिफाफा – 'ब'** उघडण्यात आला. **लिफाफा- 'ब' मध्ये** निविदाकारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून, निविदेचे प्राप्त तांत्रिक निविदामधील माहिती छाननीकरिता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास देण्यात आलेली होती.

९.४ महानगर आयुक्त यांनी असेही नमूद केले की, वरील निविदाकारांचे तांत्रिक निविदेची छाननी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारामार्फत करण्यात आली व वरील नमूद सर्व प्राप्त निविदा देकार, तांत्रिक निविदेबाबतचे सर्व निकष पूर्ण करीत असल्याने, मुख्य अभियंता, अभियांत्रिकी विभाग, यांचेकडून सर्व निविदाकारांचे **लिफाफा – 'क'** उघडण्याची शिफारस कार्यालयीन टिप्पणीव्दारे करण्यात आली. यास अनुसरून महानगर आयुक्त यांचेकडून

दि.१२/०१/२०२१ रोजी मंजूरी प्राप्त झाल्यानंतर, सम दिनांकास सर्व निविदाकारांचे **लिफाफा — 'क'** उघडण्यात आले. निविदा देकाराचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे :-

निविदा रक्कम रू. १८४,८७,००,०००/- (वस्तु व सेवा कर वगळून)

| | **कामाचे नाव: बाळासाहेब ठाकरे राष्ट्रीय स्मारकाचे बांधकाम करणे.** | | | |
|---|---|---|---|---|
| | **विवरण पत्र** | | | |
| मुं.म.प्र.वि.प्राधिकरण | निविदाकारांचे नाव, निविदा देकार (वस्तु व सेवा कर वगळून) | | | |
| निविदा रक्कम (वस्तु व सेवा कर वगळून) | मे. टाटा प्रोजेक्टस लि. **लघुत्तम निविदा क्र.१** | मे. एल ॲण्ड टी कंपनी **लघुत्तम निविदा क्र.२** | मे. शापुरजी पालनजी ॲण्ड कंपनी **लघुत्तम निविदा क्र. ३** | मे. नागार्जुन कंन्स्ट्रक्शन कंपनी **लघुत्तम निविदा क्र.४** |
| रू. १८४,८७,००,००० | रू. १८०,९९,००,००० | रू. १९०,००,००,००० | रू. १९३,९५,०३,४११ | रू. २१५,०९,६२,५७५ |
| % दर | २.०९८ % कमी दराची | २.७७ % अधिक दराची | ४.९१ % अधिक दराची | १६.३५ % अधिक दराची |

मे. आभा नरेन लांबा असोसिएट्स वास्तुविशारद व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी मे. टाटा प्रोजेक्टस लि. यांचा लघुत्तम निविदा देकाराबाबत अहवालासह शिफारस केलेली आहे. दि. १३/०१/२०२१ रोजीच्या सदर निविदा देकार शिफारसीसह निविदा शिफारस समितीसमोर सादर करण्यात आल्या. अति. महानगर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली निविदा शिफारस समितीची प्रथम बैठक दि. १३/०१/२०२१ व व्दितीय बैठक दि. १४/०१/२०२१ रोजी पार पडली. सदर बैठकीत मे. टाटा प्रोजेक्टस लि. यांची लघुत्तम निविदा देकार (रू. १८०,९९,००,०००/) (वस्तु व सेवा कर वगळून) स्विका-हार्य असल्याबाबतचा अहवाल शिफारशीसह मंजूरीस्तव सादर करण्यात आला. दि. १५/०२/२०२१ रोजी महानगर आयुक्त यांनी निविदा शिफारस समितीच्या शिफारशीस सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावाच्या मंजूरीच्या अधिन राहून मान्यता दिली. स्मारक बांधकामासाठी मे. टाटा प्रोजेक्टस लि. यांचा लघुत्तम निविदा देकार रू.१८०,९९,००,०००/- (वस्तू व सेवाकर वगळून) हा निविदा रक्कम रू. १८४,८७,००,०००/- (वस्तू व सेवाकर वगळून) पेक्षा (२.०९८ प्रतिशत कमी दराची) व निविदेतील अटी व शर्तीची

पूर्तता करणारी वाजवी निविदा देकार असल्याने, निविदा शिफारस समितीने शिफारस केल्याप्रमाणे निविदेमध्ये मागितलेले विवरणपत्र (Schedule) हे मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाकडून अंतिम करणार असल्याने व त्याबाबत हमीपत्र मे. टाटा प्रोजेक्ट लि. यांनी सादर केलेले असल्याने व निविदेच्या रक्कमेमध्ये कोणतीही बदल होणार नसल्याने त्यास मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव कार्यकारी समितीस सादर करण्यात येत आहे.

**निर्णय : सविस्तर चर्चेनंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन कार्यकारी समितीने पुढील ठराव मंजूर केला :-**

**ठराव क्र.१४०७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या सर्व अधिकाराचा वापर करून कार्यकारी समिती याव्दारे शिवाजी पार्क, दादर येथील महापौर बंगल्याच्या जागेवर बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक उभारण्याच्या बांधकामाकरिता मे. टाटा प्रोजेक्टस लि. कंपनीची लघुत्तम निविदा देकार रू. १८०,९९,००,०००/- (वस्तु व सेवा कर वगळून) हा निविदा रक्कम रू. १८४,८७,००,०००/- (वस्तु व सेवा कर वगळून) पेक्षा रक्कम २.०९८ प्रतिशत कमी दराची स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटीप्रमाणे देय होणारा वस्तु व सेवा कर व संभाव्य भाव वाढीच्या आर्थिक बदलासह सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या अधिन राहून अधिदान करण्यास मान्यता देत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र. १०अ: मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१९ ते दिनांक ३१ मार्च, २०२०</u>**

मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीच्या दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१९ ते दिनांक ३१ मार्च, २०२० रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय: मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. १०ब: मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२०**

मुंबई नागरी विकास प्रकल्प – फिरता निधीच्या दिनांक ०१ एप्रिल, २०२० ते दिनांक ३० सप्टेंबर, २०२० रोजीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**निर्णय: मुंबई नागरी विकास प्रकल्प-फिरता निधीच्या सहामाही व्यवस्थापन अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ११अ: प्राधिकरणाचे दिनांक ३०.०६.२०२० रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० जून, २०२० रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**निर्णय: सदर त्रैमासिक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ११ब: प्राधिकरणाचे दिनांक ३०.०९.२०२० रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३० सप्टेंबर, २०२० रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**निर्णय: सदर त्रैमासिक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

**बाब क्र. ११क: प्राधिकरणाचे दिनांक ३१.१२.२०२० रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या दिनांक ३१ डिसेंबर, २०२० रोजी संपणाऱ्या त्रैमासिक लेख्यांबाबत संक्षिप्त माहिती दिली. त्यानंतर, प्राधिकरणाच्या त्रैमासिक लेख्यांची नोंद घेऊन लेख्यास कार्यकारी समितीने मान्यता दिली.

**निर्णय: सदर त्रैमासिक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.**

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

*********